कार्यालय नगरपंचायत सेलू

ता.सेलू जि.वर्धा - ४४२१०४

एक कदम स्वच्छता की ओर

दूरध्वनी क्र. 07155-220111 टोल फ्री.7066012266 ई.मेल- npseloo@gmail.com

जाक्र/नपसे/कावी/२५२४/२०१९ दि. २३/०४/२०१९

प्रती,

श्री.चंद्रशेखर रेवतकर

साई इन्फ्राटेक नागपूर

विषय – नगरपंचायत ला ले–आउट हस्तांतरण केल्याबाबत.

संदर्भ - 1) आपले अर्ज दि.१२/०४/२०१९ नुसार

2) आपले अर्ज आ. दि.१९/०७/२०१९ नुसार

महोदय,

आपणास वरील संदर्भीय विषयाचे अनुशंगाने कळविण्यात येते की, आपले साई नगर म्हणून ओळखले जाणारे ले-आउट अकृषक आदेश गट क्र १० N.A. आदेश अकृषक ३४/२०१७ -१८ दि. २०/०७/२०१८ नुसार मौजा सेलू सर्व्हे नं. १०१ आराजी १०८३५ चौ. फुट एकूण ५३ प्लॉट ची नोंदणी नगरपंचायत रेकोर्डला केलेली आहे. व सदर ले-आउट मधीलअभिन्यासातील ओपन स्पेस, नाल्या, रोड वगैरे हस्तांतरणाचा करारनामा दि.२८/०३/२०१९ नुसार हस्तांतरण केले आहे. तरी आम्ही याले-आउट मध्ये भविष्यात आवश्यक त्या सेवा सुविधा पुरविण्याचा प्रयत्न करणार आहोत.

करिता आपणास माहिती सादर.

कार्यालय नगरपंचायत सेलू जि. वर्धा

प्रशासकीय अधिकारी
नगरपंचायत सेलू



महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2017 ◐ AG 672544

अभिन्यासातील खुली जागा, रस्ते वगैरे हस्तांतरणांचा करारनामा

28 MAR 2019

करारनामा लिहून देणार :- **पार्टी क्र. 1 मे. साई ईन्फ्राटेक**
तर्फे भागीदार श्री. चंद्रशेखर क्रिष्णाजी रेवतकर व इतर दोन
रा.पो. शॉप नं.6, तळ मजला, रोहेरा आर्केड, अजनी चौक, नागपूर.

करारनामा लिहून घेणार :- **पार्टी क्र. 2 मुख्याधिकारी साहेब,**
नगर पंचायत, सेलू

पार्टी नं. 1 तर्फे करारनामा लिहून देण्यांत येतो की, सेलू नगर पंचायत हद्दीतील माझे मालकीचे स.नं. 101 येथील अभिन्यास मे. साई ईन्फ्राटेक या नावाने तहसिलदार, सेलू, नगर रचनाकार, वर्धा यांचेकडून मौजा सेलू/स.नं. 101/नरव/381 दि. 01/03/2018 अन्वये निवासी वापराकरीता मंजुर करण्यात आले आहे. सदरहू अभिन्यासाची जागा मा.जिल्हाधिकारी, वर्धा यांचे आदेश मामला क्र. 14/ एन.ए.पी.-34/2017-2018 दि. 20/07/2018 नुसार अकृषक झालेली आहे. त्यानुसार सदरहू अभिन्यासातील खुलीजागा व रस्त्याचे क्षेत्र सार्वजनिक प्रयोजनार्थ देखरेखीकरीता या करारनाम्याद्वारे नगर पंचायतला खालील अटीवर 1/- रुपया नाममात्र मुल्य आकारुन हस्तांतरीत करण्यांत येत आहे.



४६२ १२/४/१९

करारनामा

साई इन्फ्राटेक, तर्फे

भागीदार श्री. चंद्रशेख

कृष्णाजी रेवतकर

रा. नागपुर

Rewat

मुद्रांक विक्रेता सुनिल एस. [illegible] सुनिल कार्यालय, सेड

[illegible] क्र. ११/२००१ कोड नं. ४५०३०१२,

[illegible] मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी

[illegible] बंधनकारक नाही

Rewat

1. सदरहू अभिन्यासातील अभिन्यासातील Open Space Area 1658.86 Sq.Mtr. & Road Area 4006.20 Sq.Mtr. वगैरे सार्वजनिक प्रयोजनार्थ राखीव जागांची देखभाल, उदा. रस्ते, नाल्या वगैरे नगर पंचाययततर्फे करण्यात येईल.
2. सार्वजनीक प्रयोजनार्थ उपरोक्त जागांचा विकास करतेवेळी पार्टी क्र. तर्फे कोणताही हस्तक्षेप करण्यात येणार नाही.
3. अभिन्यासातील Open Space Area 1658.86 Sq.Mtr. & Road Area 4006.20 Sq.Mtr. इत्यादींचा विकास शासनाचे व नगर पंचायतीचे धोरणात्मक निर्णयानुसार करण्यात येईल.
4. वरीलप्रमाणे हस्तांतरीत जागांवर पार्टी क्र. 1 चा किंवा त्यांचे इस्टेट वारसाचा या करारनाम्यानंतर कोणताही हक्क व दावा राहणार नाही.
5. महाराष्ट्र नगर पंचायत व औद्योगीक नागरी अधिनियम 1965 चे कलमातील सर्व शर्ती व अटींना अधीन राहूनच हस्तांतरांची कार्यवाही करण्यात येत आहे.
6. सदर शेत स.नं. 101 ले-आऊट मधील बोरवेल ही सार्वजनिक वापरासाठी राहील यांस माझा काहीही उजर राहणार नाही.

सबब वरिलप्रमाणे करारनामा आज दि. 12/04/2019 रोजी नगर पंचायत कार्यालय येथुन लिहून घेण्यांत येत आहे व माझे ईस्टेट वारसानांस लागू राहील.

साक्षीदार -

1. Ganesh S. Dekate

2. निखिल पराते.

मे. साई इन्फ्राटेक तर्फे भागीदार
श्री. चंद्रशेखर क्रिष्णाजी रेवतकर व इतर
दोन हस्तांतरण करुन देणार

मुख्याधिकारी
नगर पंचायत सेलू जि. वर्धा
नगर पंचायत, सेलू
हस्तांतरण करुन घेणार